पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**दिनांक - २०/०७/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक **२०/०७/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जुन २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑन लाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.साधना अंकुश मळेकर
३. मा.अनुराधा गणपत गोरखे
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.शारदा सोनवणे अनुमोदक - मा.अनुराधा गोरखे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची मंगळवार दिनांक २०/०७/२०२१ ची पाक्षिक सभा (कार्यपत्रिका क्रमांक १५) ही सोमवार दिनांक २६/०७/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती** - सोमवार दिनांक २६/०७/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(**प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २०/०७/२०२१ ची तहकुब सभा **)**

**दिनांक - २६/०७/२०२१** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **दिनांक २०/०७/२०२१ ची तहकूब** सभा **सोमवार** दिनांक **२६/०७/२०२१** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑन लाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.अनुराधा गणपत गोरखे
३. मा.सोनवणे शारदा हिरेन
४. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
५. मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या शिवाय मा.आण्णा बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.भाऊसाहेब साबळे - उप अभियंता, मा.संजय चव्हाण, मा.संजय बंडगर - कनिष्ठ अभियंता (नगररचना विभाग) - हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक १४) दि.०६/०७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २६/०७/२०२१ विभाग - नगररचना व विकास
सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.शारदा सोनवणे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८६/२०२१, दि.०७/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५|१०५०|प्र.क्र.७९५|०५|नवि-१३, दि.३०|०५|२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र.टिपीएस-१८०८|८९४|सीआर-१७२७|०९|नवि-१३, दि.१८|०८|२००९, व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२|१६०|सीआर-५८|१२, पुर्नरचना नं.|२७|१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि.०२|०३|२०१५ अन्वये विकास

योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं.१ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्ते प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता.हवेली, जि.पुणे येथील मंजूर विकास योजने मधील स.नं.१ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीच्यादृष्टीने सदरचे सेवा रस्ते विकसित होणे गरजेचे आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं.१ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २६/०७/२०२१ विभाग - नगररचना व विकास

सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८५/२०२१, दि.०७/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५|१०५०|प्र.क्र.७९५|०५|नवि-१३, दि.३०|०५|२००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिपीएस-१८०८|८९४|सीआर-१७२७|०९|नवि-१३, दि.१८|०८|२००९, व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२|१६०|सीआर-५८|१२, पुर्नरचना नं.|२७|१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि.०२|०३|२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील मंजूर विकास योजनेनुसार स.नं. ३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्ता प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता.हवेली, जि.पुणे येथील मंजूर विकास योजने मधील स.नं.३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं.३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा.महापालिका

सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २६/०७/२०२१ विभाग - नगररचना व विकास

सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८३/२०२१, दि.०७/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि.३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिपीएस-१८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि.१८।०८।२००९, व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि.०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील मंजूर विकास योजनेनुसार स.नं.७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्ते प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता.हवेली, जि.पुणे येथील मंजूर विकास योजने मधील स.नं.७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं.७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ०४

दिनांक - २६/०७/२०२१ विभाग - नगररचना व विकास

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.शारदा सोनवणे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८४/२०२१, दि.०७/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिपीएस-१८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि.१८।०८।२००९, व अधिसुचना क्र.टिपीएस-

१८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि.०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं.७३ मधील आरक्षण क्र.४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या आरक्षणाने प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता.हवेली, जि.पुणे येथील मंजूर विकास योजने मधील स.नं.७३ मधील आरक्षण क्र.४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या आरक्षणाचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता, PMAY प्रकल्प विभाग यांचेकडून सदर आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं.७३ मधील आरक्षण क्र.४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन वपुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३६४ /२०२१
दिनांक : २६/०७/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.